महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२ - २६५६६३३६
E-mail : pao@mahakosh.in

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/नियंत्रण/व्यवस्थापन-१/साफसफाई/जा.क्र.416 दि. 13 DEC 2023

प्रति,
सहसंचालक (संगणक),
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
संगणक कक्ष, ५ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०००२१.

विषय :- अधिदान व लेखा कार्यालयाच्या अंतर्गत साफसफाईच्या ठेक्याची निविदा शासनाच्या संकेतस्थावर प्रसिध्द करणेबाबत.

अधिदान व लेखा कार्यालयाच्या अंतर्गत साफसफाई ठेक्याकरीता दोन वर्षांच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत. आपणास विनंती करण्यात येते की, सोबत नमूद केलेल्या निविदेचा मसुदा शासनाचे संकेतस्थळ www.mahakosh.maharashtra.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक १५/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

(विलास गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी

सोबत :- निविदेचा नमुना.

महाराष्ट्र शासन
अधिदान व लेखा कार्यालय
वांद्रे-कुर्ला संकुल
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
ई निविदा सूचना व सविस्तर वेळापत्रक

अधिदान व लेखा कार्यालयाच्या वांद्रे कुर्ला संकुलातील सात मजली इमारत व चर्चगेट येथील कार्यालय साफसफाई करणे अशा कामाचा किमान तीन वर्षांचा पुर्वानूभव असलेल्या कंत्राटदारांकडून दोन लिफाफे पद्धतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदेचा सविस्तर तपशिल आणि अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन निविदेचे सादरीकरण खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर online करावयाचे आहे. मुंबई महानगर प्रदेश विभागासारख्या भागातील बहुमजली कार्यालयीन इमारतीच्या साफसफाईच्या कामाचा किमान तीन वर्षांचा पूर्वानूभव असलेल्या निविदाकारांनी निविदा भराव्यात.

निविदेचा संदर्भ	ई-निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक १३/१२/२०२३ https://mahatenders.gov.in
निविदा प्रसिद्धीची वेळ	दि. १५/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता
निविदेची ऑनलाईन उपलब्धता, निविदा फॉर्म भरणे, कागदपत्रे अपलोड करणे व निविदा फॉर्म रक्कम, इसारा रक्कम यांचा ऑनलाईन पध्दतीने भरणा करणे कालावधी	दि. १५/१२/२०२३ सकाळी १०.०० वाजेपासून ते दि. २९/१२/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत
निविदा फॉर्म रक्कम व अनामत रक्कम यांचा भरणा करण्याचे स्थळ	ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर
निविदा पूर्व बैठक	दि. २०/१२/२०२३ सकाळी ११.०० वाजता अधिदान व लेखा कार्यालय, लेखा कोष भवन, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१.
तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ व स्थळ	दि. ०२/०१/२०२४ सकाळी ११.०० वाजता अधिदान व लेखा अधिकारी यांचे दालन, अधिदान व लेखा कार्यालय, लेखा कोष भवन, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१.
वाणिज्य लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ व स्थळ	तांत्रिक निविदा मध्ये पात्र संस्थांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल.

निविदाकारांनी निविदा फॉर्म फी, अनामत रक्कम यांचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेटवे (Gateway) द्वारे करावयाचा आहे. खरेदी समितीने मा. अधिदान व लेखा अधिकारी यांच्या स्तरावर कोणतीही निविदा स्विकारण्याच्या अथवा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे अथवा कालावधी वाढविणे / कमी करणे यासारखे सर्व हक्क राखून ठेवले आहेत व त्याबाबत कोणतीही कारणमिमांसा करण्यात येणार नाही.

टीप :- कोरोना (कोविड-१९) या जागतिक महामारीचा विचार करता, भविष्यात अशा स्वरुपाची महामारी कोणत्याही वेळेत उद्‌भवल्यास कार्यालयास दैनंदिन साफसफाईची तत्पर सेवा विनाअडथळा मिळावी यादृष्टीने कंत्राटदारांचे कार्यालय तसेच ते पुरवित असलेल्या सेवा यांचे सेवा केंद्र, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रामध्ये असणे आवश्यक राहील.

सही/-
अधिदान व लेखा अधिकारी
महाराष्ट्र शासन